अहवाल दिनांक : 21/11/2022

## महाराष्ट्र शासन

### गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- **कौलखेड** ( 530030 )
ULPIN : **29194367617** तालुका :- **अकोला** जिल्हा :- **अकोला**
गट क्रमांक व उपविभाग : 6/7/1/अ/13
29194367617
भू-धारणा पध्दती : **सरकार**

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | शेताचे स्थानिक नाव |
| क्षेत्राचे एकक आर.चौ.मी<br>अकृषिक क्षेत्र<br>बिन शेती 20.68.00<br>आकारणी 0.00 | 4026 | खुली जागा | 20.68.00 | | | ( 40 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>अकृषिक वापर - रहिवास (गावठाणाबाहेरील)<br>रामाक्र एन ए पी 34/16/2011-12 दि 25/3/13<br>( 8470 )<br>प्रलंबित फेरफार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक 12389 व दिनांक 07/11/2022 |
| जुने फेरफार क्र. ( 12389 ) | | | | | | | सीमा आणि भुमापन चिन्हे |

### गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- **कौलखेड** ( 530030 ) तालुका :- **अकोला** जिल्हा :- **अकोला**
गट क्रमांक व उपविभाग : 6/7/1/अ/13

| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

**"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."**
**दिनांक** :- 21/11/2022
**सांकेतिक क्रमांक** :- 27050004005013000011 20221109

आर. डी. सोनोने
**नाव** :- रविंद्र दयाराम सोनोने कौलखेड
**तलाठी साझा** :- कौलखेड ता :- अकोला **जि** :- अकोला
साझा क्र. 10, ता.अकोला
दि. 21/11/2022



Scanned with OKEN Scanner

## श्री.अरुण शिंदे, भा.प्र.से जिल्हाधिकारी अकोला यांचे कार्यालय

रामाक्रं एनएपी/34/कौलखेड/२६/ 2011/2012

अर्जदारः- 1. श्री. सुनिल माणिकलाल इन्नानी रा. गौरक्षण रोड अकोला
2. श्री. प्रशांत शांतीलाल कोठारी रा. अकोला
3. श्री.संतोष नरेंद्रकुमार हेडा एचयुएफ रा. शास्त्री नगर अकोला
4. सौ.तृप्ती संतोष हेडा रा. शास्त्री नगर अकोला
5. श्री. संतोष नरेंद्रकुमार हेडा रा. शास्त्रीनगर नगर अकोला

### आदेश

(पारीत दिनांक---२४---माहे मार्च, 2013)

प्रस्तुत प्रकरणात श्री.गणेश अर्जुनसिंग बलोदे व इतर यांनी त्यांचे मालकीच्या मौजे कौलखेड ता.जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. 6+7/1 मधिल क्षेत्र 0.91 हें आर जागेचे निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापराची परवानगी मिळणेबाबतचा अर्ज सादर केला होता. अर्जासोबत अर्जदाराने मालकीहक्काबाबत 7/12. टिपण उतारा, 3. मोजणी शिट (ब) प्रतीवरुन मोजणी शिटची प्रत 4 प्रस्तावित भुखंडक अभिन्यासाचे प्रती संलग्न केलेल्या आहेत. प्रास अर्जाचे अनुषंगाने प्रकरण पंजीबध्द करुन घेण्यात येऊन प्रकरणात पुढील चौकशी/कार्यवाही सुरु करण्यात आली होती. प्रकरण निर्णयाधिन असतांना अर्जदार गणेश अर्जुनसिंग बलोदे व इतर चार यांनी विषयांकित जमिन ही सुनिल माणिकलाल इन्नानी व इतर यांना रजिष्टर्ड खरेदी खतानुसार विक्री केली असुन हक्क अभिलेखांत त्यांचे नांवे नोंद सुध्दा घेण्यात आल्याबाबत अर्ज दाखल केला . तरी सदरहू जमिनीचे अकृषक प्रकरणात अर्जदार म्हणुन 1. श्री. सुनिल माणिकलाल इन्नानी रा. गौरक्षण रोड अकोला 2. श्री. प्रशांत शांतीलाल कोठारी रा. अकोला 3. श्री.संतोष नरेंद्रकुमार हेडा एचयुएफ रा. शास्त्री नगर अकोला 4. सौ..तृप्ती संतोष हेडा रा. शास्त्री नगर अकोला 5. श्री. संतोष नरेंद्रकुमार हेडा रा. शास्त्री नगर अकोला यांना सामील करुन त्यांचे नांवे अकृषक आदेश पारित करण्यात यावे असा अर्ज दाखल केल्यावरुन प्रकरणात अर्जदार म्हणुन सुनिल माणिकलाल इन्नानी व इतर यांचे नांवे अकृषक आदेशात समाविष्ट करण्यात येत आहे .

अर्जदार यांनी प्रकरणातील त्रृटी पुर्तता न केल्यामुळे सदर प्रकरण नस्ती करण्यात आले होते परंतु अर्जदार यांनी विनंती केल्या नुसार सदर प्रकरण पुन्हा सुरु करण्यात आले .

2. तत्पुर्वी प्रकरणात तपासणी करुन अकृषक परवानगीबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात येऊन, मामल्यात सदरच्या प्रस्तावित जमिनीचे बाबतीत दिनांक 24.12.2012 रोजी जाहीरनामा काढुन तहसिलदार अकोला, आयुक्त, म न पा अकोला संबंधित तलाठी कौलखेड मार्फत तहसिलदार अकोला यांचेकडे प्रसिध्दीस पाठविण्यात आला. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावर लावुन प्रसिध्द करण्यात आला.

3. प्रस्तुत प्रकरणात पुवोक्त अर्जदार यांनी सहायक संचालक नगर रचना अकोला यांचेकडे छाननी शुल्काचा भरणा केल्याबाबत चलान न सादर केल्यामुळे दिनांक 20.9.2012 च्या आदेशानुसार नस्ती करण्यात आले होते. दरम्यानचे काळात अर्जदार यांनी पुनश्च अर्ज दाखल करुन प्रकरण सुरु करणेबाबत विनंती केले नुसार प्रकरण पुनश्च प्रकरण सुरु करण्यात आले. त्यानुसार खालील विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

अ) सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अकृपीक/मौजे कौलखेड/स.क्रं 6+7/1 /1115 दिनांक 11.9.2012 नुसार तात्पुरती मंजुरी प्रदान करुन तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे उपअधिक्षक, भुमि अभिलेख अकोला यांचेकडुन भुखंड निहाय मोजणी करुन घेण्याबाबत कळविले आहेक्षक, भुमि अभिलेख अकोला यांनी पत्र क्रं मो.र.क्रं 486/2012 दिनांक 12.1.2013 नुसार भुखंड निहाय मोजणी केली असुन मोजणीची क प्रत सादर केलेली आहे.

ब) प्रकरणात भुखंडक निहाय मोजणीच्या क प्रती प्रमाणे अर्जदार यांनी सिमांकित अभिन्यास या कार्यालयास अंतीम मंजुरीसाठी सादर केले असता, सिमांकित अभिन्यासाच्या प्रती, सहायक संचालक नगर रचना अकोला यांना अंतीम मंजुरीचे शिफारसीसाठी पाठविण्यात आल्यात.

सहायक संचालक नगर रचना अकोला यांनी पत्र क्र.अकृषी/मौजे कौलखेड/स.क्र 6+7/1/ससंनरअ/232 दिनांक 07/02/2013 नुसार नेहमीच्या अटी व शर्थीस अधिन राहून सिमांकित अभिन्यासास अंतीम मंजुरी देऊन निवासकामी अकृषक आकारणी निर्धारित करून देण्यासाठी शिफारस केली आहे.

3. तत्पुर्वी प्रकरणात प्राप्त झालेल्या संबंधित विभाग/कार्यालयाचे अहवाल/नाहरकत प्रमाणपत्राचे विवेचन खालील प्रमाणे देण्यात आहे आहे.

क) उपविभागीय अधिकारी अकोला यांनी पत्र क्र.प्रस्तु-1/उविअ/कावि-27/2013 दिनांक 4.1.2013 अन्वये विहीत नमुण्यात मोका पाहणी अहवाल सादर केला असुन सदरहू अहवालानुसार निवासकामी अकृषक परवानगी देण्यास हरकत नाही. असे कळविल आहे.

ड) विशेष भुमि संपादन अधिकारी कापुमोप्र अकोला यांनी पत्र क्र.कक्ष-8/भुसंपाद/कावि-166/2013 दिनांक 14/2/2013 नुसार सदरहू जागेचा नविन प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. यापुर्वी प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबावत अधिनस्त यंत्रणेकडुन खात्री करुन घ्यावी असे कळविले आहे.

ई) पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-28/पुनर्वसन/अका/कावि-1332/12 दिनांक 6.12.2012 नुसार मौजे कौलखेड येथील शेत सर्व्हे नं. 6+7/1 मधिल क्षेत्र 0.91 हे.आर. हया जमिनीचा अतिरीक्त जमिन म्हणुन संपादनाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे अहवालीत केले आहे.

फ) कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब तारमार्ग वांधकाम विभाग अकोला यांनी पत्र क्रमांक 2987 दिनांक 31.12.2012 मौजे कौलखेड येथील शेत सर्व्हे नं. 6+7/1 मधिल क्षेत्र 0.91 हे.आर जमिनीचे अकृषक आकारणीस रुपांतर करण्यास हरकत नसल्याबाबत कळविले आहे.

भ) उपकार्यकारी अभियंता, अकोला पाटवंधारे विभाग अकोला यंनी पत्र क्र.563/दिनांक 9 जानेवारी, 2013 नुसार विषयांकित जमिनीचे एकुण क्षेत्र 0.91 हे.आर असुन सदरहू क्षेत्र मोर्णा नदीच्या पुराच्या रेड झोन मध्ये येते. सदरहू क्षेत्र रेड झोन हयास नियंत्रतीत क्षेत्र म्हणुन शासन परिपत्रक दिनांक 2.9.1989 अन्वये नियंत्रीत क्षेत्र म्हणुन संबोधण्यात येते. सदरहू परिपत्रकातील क परिच्छेदातील अटीस अधिन राहून अकृषक आकारणीस परवानी दिल्यास हरकत नाही. असे कळविले आहे. सदरहू नाहरकत पत्रातील अट या आदेशाचे अटीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

न) आयुक्त महानगरपालीका अकोला यांनी त्यांचेकडील पत्र जाक्रं/अमपना/नर/884-13 दिनांक 4.3.2013 नमुद केलेल्या अटीवर अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

1) सहा संचालक नगर रचना शाखा कार्यालय यांनी शिफारस केल्यानुसार अभिन्यासाची आखणी करुन अभिन्यास विकसीत करावा लागेल.

2) अभीन्यासातील रस्ते व खुली जागा

3) अभिन्यासातील रस्ते,खुली जागा,यांचा स्वखर्चाने महानगरपालीकेकडे विहीत निकषानुसार विकासीसत करणेबाबत विकास परवानगी घेणे बंधनकारक राहील त्याशिवाय अभिन्यासातील भुखंडावर परवानगी देता येणार नाही.

4) आजुबाजूचे नागरीकांचे सुविधाधिकार बाधित होऊ नये.

Scanned with OKEN Scanner

62

प्रकरणात अर्जदार यांचे प्रस्तावित जमिनीस अकृषक आकारणीस रुपांतर करण्याबाबत खालील विभाग यांना अभिप्राय-अहवाल पाठविणेबाबत सुचित करण्यात आले होते.

1. पोलीस अधिक्षक, अकोला
2. कार्यकारी अभियंता, महा. राज्य विद्युत मंडळ अकोला
3. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला
4. विशेष भुसंपादन अधिकारी आरपीकेव्ही अकोला

उपरोक्त विभागांस या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-8/प्रस/मह/प्रक्र/कावि-18796/12 दिनांक 3.10.2012 व 24.12.2012 नुसार सदरहू प्रकरणात तात्काळ अहवाल अभिप्राय देणेबाबत निर्देशित करण्यात आले. परंतू उपरोक्त विभागाने सदरहू जमिनीचे अकृषक रुपांतरणास हरकत आहे किंवा कसे या बाबत अभिप्राय - अहवाल सादर केले नाहील. सबब प्रकरणात शासन परिपत्रक दिनांक 12.10.1988 अन्वये त्यांची नाहरकत गृहीत धरण्यात येत आहे.

प्रकरणात संबंधित जमिनीचा जाहीरनामा दिनांक 24.12.12 प्रसिध्दीनुसार कोणाचेही कोणतीही हरकत अथवा आक्षेप विहीत मुदतीत किंवा आता पावेतो या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

6. सदर प्रस्तावित क्षेत्र मौजे कौलखेड ता जि. अकोला येथील सर्व्हे नं. 6+7/1 मधील 0..91 क्षेत्र 9100..00 चौ.मी. जमिनीस बिनशेती निवासी प्रयोजनसाठी परवानगी देण्याचे दृष्टीने दिनांक 1.8.2006 पासुन सुधारीत अकृषक कर आकारणी येत आहे. आकारणी प्रमाणदर महाराष्ट्र राजपत्र दिनांक 10.8.2006 नुसार प्रसिध्द झाले आहेत, परंतू शासन परिपत्रक महसुल व वनविभाग क्र.एनएए-1005/प्र.क्र.216/ल-5 दिनांक 19.9.2006 अन्वये सदरहू आकारणीस स्थगिती देण्यात आली असुन सदरहू दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. करीता तुर्तास शासन अध्यादेश दिनांक 14.9.2001 अन्वये सन 1991 च्या अकृषक आकारणीच्या प्रमाणदराच्या 06 पट दराने आकारणी करण्यात येत आहे. तथापी यानंतर दिनांक 01.08.2006 पासुन हमी कालावधी करीता शासनाचे प्राप्त आदेशानुसार कर आकारणी प्रमाणदरात होणा-या वाढीमुळे येणारी तफावतीची रक्कम भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| अकृषक कर आकारणीचा तपशिल खालील प्रमाणे विवरणात नमुद केल्यानुसार आहे.<br>जमिनीचे एकुण क्षेत्रफळ | 9100.00 चौ.मी. | |
| रुपांतरणाखालील क्षेत्रफळ | 9100.00 चौ.मी. | |
| विवरण | जमिनीचेक्षेत्रफळ (चौ.मि.) | अकृषक कर आकारणी रुपये 0.90 पैसे प्रति चौमि (रु.यात) |
| 1. निवासी क्षेत्र/भुखंडाखालील क्षेत्र | 5537.72 | 4984.00 |
| 2 खुल्या जागेचे क्षेत्र | 1424.58 | - |
| 3.रस्ते व कव्हेचर खालील क्षेत्र | 2067.70 | - |
| 4. समाधीखालील क्षेत्र | 0.70 | |
| एकुण रुपांतरणाखालील क्षेत्र | 9100.00 | 4984.00 |

Scanned with OKEN Scanner

जमिन अकृषक रुपांतरणाखालील अभिन्यासांतर्गत खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनिक वापरात येत असल्याने हया जमिनीवरील अकृषक कर आकारणीस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 117(5) अन्वये खाली नमुद विवरणात दर्शविल्याप्रमाणे अकृषक आकारणीतुन सुट देण्यात येत आहे.

| विवरण | क्षेत्रफळ(चौ.मि.) | सुट दिलेला आकार/कर (रुपये) |
|---|---|---|
| रस्त्याखालील क्षेत्र | 1424.58 | 1282.00 |
| खुल्या जागेचे क्षेत्र | 2067.70 | 1861.00 |
| समाधी खालील क्षेत्र | 0.70 | 63.00 |

मंजुर केलेल्या अभिन्यासातील निवासी भुखंडावर अकृषक आकारणीचा तपशिल या आदेशासोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेला आहे.

6. सदर प्रकरणात प्रस्तावित जमिनीबाबतचे मालकीहक्क, आवेदकांनी सादर केलेले कागदपत्रे, तसेच आवेदकांचे जमिनीचे मालकीहक्क व जमिनीचे भोगवटदार वर्ग-1 चे खातेदार असल्याचे स्पष्ट होत असुन कोणताही बोजा दर्शविलेला आढळत नाही. आवेदकांनी उक्त जमिनीवर विज, पाणी, रस्ते व नाल्या ई.सोयी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्र सादर करुन अकृषक आदेशातील अटी व शर्थी मान्य असल्याबाबतचे शपथ पत्र सादर करुन मंजुर अभिन्यासातील खुल्या जागेवर जलपुर्नःभरण ((Rain water Harvesting) ची व्यवस्था स्वखर्चाने करण्याचे मान्य केले आहे.

7. सबब उपरोक्त माहिती-अहवालान्वये मी, अरुण शिंदे भा.प्र.से. जिल्हाधिकारी अकोला-या द्वारे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 44 (2) अन्वये मौजे कौलखेड येथील शेत 6+7/1 मधिल क्षेत्र 0.91 हे.आर या शेतजमिनीचे आवेदक 1. श्री. सुनिल माणिकलाल इन्नानी रा. गौरक्षण रोड अकोला 2. श्री. प्रशांत शांतीलाल कोठारी रा. अकोला 3. श्री.संतोष नरेंद्रकुमार हेडा एचयुएफ रा. शास्त्री नगर अकोला 4. सौ..तृप्ती संतोष हेडा रा. शास्त्री नगर अकोला 5. श्री. संतोष नरेंद्रकुमार हेडा रा. शास्त्री नगर यांना निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापर करण्यासाठी नमुद शर्ती व अटीवर परवानगी मंजुर करीत आहे.

अटी व शर्ती :-

1. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 44 व त्याखालील प्रचलित नियमाच्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.
2. सदर जमिनीची परवानगी आवेदकाने सादर केलेल्या अभिन्यास तसेच उपअधिक्षक भुमि अभिलेख यांनी जागेवर भुखंडनिहाय मोजणी केल्यानुसार त्यांचे अहवालान्वये देण्यात येत आहे. जर जागेच्या हद्दीबाबत किंवा मालकीहक्काबाबत कोणतीही तक्रार अथवा कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.
4. सदर सिमांकित मंजुर अभिन्यास मधील रस्ते, खुली जागा, बाजुचे इतर अभिन्यास यांचेशी समन्वय साधुन सर्वांकरीता वापर/खुले ठेवणे बंधनकारक राहील. याबाबतची जबाबदारी भुखंडधारक व मनपाची राहील.
5. जमिनीच्या सिमांकित मंजुर अभिन्यासातील भुखंडकाचे विभाजन जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. मात्र विभाजन करावयाचे झाल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास, सदरचे आदेशातील अटी व शर्तीचा तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम व इतर संबंधित नियमांच्या तरतुदीचा भंग होऊ न देता परवानगी देण्यास जिल्हाधिकारी सक्षम असतील. सक्षम अधिका-याचे पुर्व परवानगी शिवाय भुखंडकाचे विभाजन करता येणार नाही.
6. आवेदकाने प्रस्तावित जमिनीचा प्रत्यक्ष अकृषक वापर एक वर्षाचे आंत करावा, व तसे केल्याबाबतचा अहवाल जमिनीचा वापर सुरु केल्यापासुन एक महिण्यात या यास

Scanned with OKEN Scanner

संबंधित तलाठी/तहसिलदार यांचेमार्फत सादर करावा, तसे न केल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 नुसार कार्यवाही करण्यात येईल.

7. विद्युत वाहीनी खालील भुखंडावर बांधकाम करतांना विद्युत कंपनीचे प्रचलित नियमानुसार विद्युत वाहिनी पासुनचे उभी व आडवी समासाची अंतरे आयएय कोड नं.56/3-1985 प्रमाणे विद्युत वाहिनीसाठी सुरक्षा पट्टी (Right of Way) प्रस्तावित करणे बंधनकारक राहील. तसेच प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीचा अवलंब करणे आवेदकास बंधनकारक राहील. वित अधिनियम 1956 चे व त्यात केलेल्या बदलाचे उल्लंघन करता येणार नाही. तसेच सदरहू जमिनीवर डिपी/विद्युत वाहिनी/टेलीफोन वाहिनी असल्यास डिपी/विद्युत वाहिनी/टेलीफोन वाहिनी अर्जदारानी स्वखर्चानी संबंधित मंडळ/कंपनी कडुन स्थानांतरीत करुन घेतल्याशिवाय कोणत्याही भुखंडाची विक्री अथवा वाटप करता येणार नाही..

8.. अभिन्यासामध्ये आखणी करुन सार्वजनिक खुली जागा तसेच रस्ते नालो व विद्युत पोल यांचा विकास केल्यानंतर रस्ते, नाल्या, विद्युत पोल व सार्वजनिक मोकळी जागा महानगरपालीकीकडे हस्तांतरीत करावी लागेल.

9. अभिन्यासातील खुल्या जागेस कुपन करणे आवश्यक राहील.

10. अभिन्यासातील भुखंडावर महानगरपालीकाचे पुर्व परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

11. अभिन्यासातील खुली जागा व रस्त्याखालील जमीन नियोजन प्राधिका-याकडे नाममात्र मुल्य रु 1 वर वर्ग करावी लागेल. त्याशिवाय भुखंडाची विक्री करता येणार नाही.

12.. सदर अभिन्यासातील खुल्या अथवा अन्य जागेत झाडे अस्तीत्वात असल्यास विना परवानगी तोडण्यात येवू नये. रेखांकनातील नियोजित केलेल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याची व जगविण्याची जबाबदारी अर्जदाराने द्यावी.

13. पावसाचे पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

14.. सदर रेखांकनाचे जागेत सांडपाणी अथवा भुपृष्ठीत पाणी वाहून नेण्यासाठी जे नैसर्गिक मार्ग असतील ते अबाधित ठेवावे अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

15.. सदर अभिन्यासातील खुल्या अथवा अन्य जागेत झाडे अस्तित्वात असल्यास विना परवानगी तोडण्यात येवू नये. रेखांकनातील नियोजित केलेल्या रस्त्याच्या दुर्तफा झाडे लावण्याची व जगविण्याची जबाबदारी अर्जदारने द्यावी. तसेच सदर जागेमधील नाल्याबावत मनपा अकोलाचे बां.नि.नि. तील नियम क्रं 11.1(बी) चे पालन करणे बांधील राहील.

16 यातील जमिनीवर निव्वळ निवासी प्रयोजनार्थ क्षेत्र 5537.72 चौ.मी आहे. दिनांक 1.8.2006 पासुन सुधारित अकृषक आकारणी प्रमाणदर महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 10.8.2006 अन्वये प्रसिध्द झाला आहे. मात्र शासन परिपत्रक दिनांक 19.9.2006 अन्वये यास स्थगिती देण्यात आली असुन सदर दरात सुधारणा करण्याची बाब विचाराधीन आहे. करीता शासन अध्यादेश दिनांक 14.9.2001 अन्वये सन 1991 च्या अकृपक प्रमाण दराच्या 06 पट दराने तात्पुरती आकारणी पुर्णांकित रक्कम रुपये 4984 (अक्षरी रुपये चार हजार नऊशे चौ-यांऐंशी फक्त) आकारण्यात येत आहे. परंतू यानंतर दिनांक 1.8.2006 पासुनचे हमी कालावधीकरीता शासनाचे प्राप्त आदेशानुसार अकृपक आकरणी प्रमाणदरात होणा-या वाढीमुळे येणारी तफावत रक्कम भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील. तसेच शासनाचे वेळावेळीचे अकृषक आकारणी वाढीबावत आदेशाचे पालन करणे आवेदकास बंधनकारक राहील.

17. अकृषक परवानगी अंतर्गत जमिन व वर्ग महापालिका क्षेत्रात येत असल्यामुळे रुपांतर कराची आकारणी शासन परिपत्रक क्रमांक एनएस-10/99/प्र.क्र.35 दिनांक 15.जुन

1999 नुसार अकृषक आकारणीच्या पाचपट आकारण्यात येत आहे. मात्र प्रकरणात तात्पुरती अकृषक आकारणी करण्यात आलेली असल्याने या रक्कमेच्या पाच पाट अर्थात रुपये 24920/- (अक्षरी रुपये चोविस हजार नऊशे विस फक्त) रुपांतर कराची तात्पुरती रक्कम भरणा करुन घ्यावा मात्र अकृषक आकारणी निश्चित केल्यानंतर त्यानुसार रुपांतरण कराच्या तफावत रक्कमेचा भरणा करणे आवेदकांना बंधनकारक राहील.

18. जागेबाबत अकृषक आकारणी कर वेळोवेळी शासनाचे निर्देशाप्रमाणे भरणा करावा लागेल.

19. वरीलपैकी कोणत्याही अटीचे/शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त बाबतीत नियमानुसार जिल्हाधिकारी अकोला जो दंड आकारतील तो भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील अथवा आदेशातील अटीचे उल्लंघन केल्यास नियमाप्रमाणे कार्यवाहीस पात्र रातील त्यामुळे होणा-या परिणामाची संपुर्ण जबाबदारी ही आवेदकाची राहील.

20. कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग अकोला यांचे पत्र दिनांक 9.1.2013 अन्वये खालील अटीचे पालन करणे बंधनकारक राहील.

अ. सदरहू शेत सर्व्हे नंबर 6 व 7 मध्ये नाला असुन नाल्यातुन जाणा-या पुराच्या पाण्याकरीता नाल्याची जागा कायम ठेवावी. नाल्यावर पुल बांधतांना कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच बांधकाम करावे.

21. अर्जदार यांनी महाराष्ट्र जमिन महसुल संहीतेनुसार विहीत नमुण्यात करारनामा, सनद करुन देणे बंधनकारक राहील.

22. विशेष अट प्रकरणांतर्गत आवेदकाने सादर केलेले कागदपत्रे मालकी हक्काबाबतचे कागदपत्रे अभिलेखावरुन जमिन त्यांच्या ताब्यातील व मालकीची असल्याचे दिसुन येते. मात्र भविष्यात जमिनीबाबत/ जमिनीचे मालकी हक्क, वारसाहक्क व हददीबाबत किंवा अन्य कोणत्या वादामुळे कोणत्याही हक्कास बाधा आल्यास तसेच आवेदकानी सादर केलेली माहीती अथवा कागदपत्रे खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास सदरपरवानगी आदेश व्यपगत होतील.

जिल्हाधिकारी अकोला

प्रतिलीपी :-

1) सहायक संचालक नगर रचना अकोला यांना माहिती तथा कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

2) उपविभागीय अधिकारी अकोला यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

3) तहसिलदार अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत. तालुका नमुना-2 मध्ये नोंद घेवुन मामल्यात पुढील आवश्यक कार्यवाही करुन सविस्तर कार्यपुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

4) उपअधिक्षक भुमि अभिलेख अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत त्यांनी क.जा.प. ची कार्यवाही करुन अहवाल सादर करावा.

5) आयुक्त मनपा अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.

6) सुनिल माणिकलाल इन्नानी व इतर सर्व रा. अकोला

7) तलाठी कौलखेड मार्फत तहसिलदार अकोला यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषीत त्यांनी गाव नमुना-2 ला नोंद घेवुन मामल्यात क.जा.प. नुसार पुढील कार्यवाही करावी मात्र अधिकार अभिलेख दुरुस्ती करु नये.

8) निवड नस्ती

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
अकोला शाखा
आवक क्र. 758
दिनांक 15-4-2013
फाईल नं. ----------

जिल्हाधिकारी अकोला

# प्रपत्र अ

प्रकरण रामाकं एनएपी/34/कौलखेड/१६/2011- 12

मौजे कौलखेड ता.जि अकोला येथील शेत स. नं 6 य 7/1 मधील 0.91 हे.आर क्षेत्रफळ 9100 चौ.मि जागेचे निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापराची परवानगी मिळणेबाबत 1. श्री. सुनिल माणिकलाल इन्नानी रा. गौरक्षण रोड अकोला 2. श्री. प्रशांत शांतीलाल कोठारी रा. अकोला 3. श्री.संतोष नरेंद्रकुमार हेडा एचयुएफ रा. शास्त्री नगर अकोला 4. श्री.तृप्ती संतोष हेडा रा. शास्त्री नगर अकोला 5. श्री. संतोष नरेंद्रकुमार हेडा रा. शास्त्री नगर अकोला

| भुखंड क्रमांक | भुखंडाचे क्षेत्रफळ | अकृषक आकारणी चा दर प्रति चौ.मी. 0.90 पैसे प्रमाणे |
|---|---|---|
| १-अ | २२१.६९ | २००.०० |
| १.-ब | १७५.५१ | १५८.०० |
| २.-अ | १८७.९५ | १६९.०० |
| २.-ब | २३६.३१ | २१३.०० |
| ३.-अ | २३१.४३ | २०८.०० |
| ३.-ब | १४०.०० | १२६.०० |
| ४. | ३२७.६६ | २९५.०० |
| ५.-अ | १६३.०१ | १४७.०० |
| ५.-ब | २३३.४३ | २१०.०० |
| ६. | ३०८.८१ | २७८.०० |
| ७. | ५५५.१५ | ५००.०० |
| ८. | ४३३.९५ | ३९१.०० |
| ९. | ४५७.४२ | ४१२.०० |
| १०. | ६०३.३४ | ५४३.०० |
| ११. | ५७६.९० | ५१९.०० |
| १२. | ६८५.१६ | ६१७.०० |
| एकुण | ५५३७.७२ | ४९८४.०० |

जिल्हाधिकारी अकोला



Scanned with OKEN Scanner